
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. २७ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०९ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

श्री शिवसाई मंदिरात भक्तिमय भजन सोहळा



(पान २ वर)

» Selected

### अडावद येथे शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर

अडावद: अडावद येथील क्षत्रिय माळी समाज मंगल कार्यालयात राज्य शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' अंतर्गत चोपडा तालुक्यातील अडावद मंडळातील नऊ गावांसाठी एकत्रित महसूल व सर्वसमावेशक शासकीय सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, सुमारे २ हजार ते २ हजार ३०० हून अधिक लाभार्थ्यांनी विविध शासकीय योजनांचा थेट लाभ घेतला. ढोल-ताशांच्या गजरात स्वागत शिबिराचे उद्घाटन आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी शामराव येसो महाजन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथक आणि ढोल-ताशांच्या गजरात आमदारांचे स्वागत केले.

### परीक्षा सुधारणांसाठी नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय कृतिगट

# आज लोकसभेत सार्वजनिक परीक्षा दुरुस्ती विधेयक

## पेपरफुटी रोखण्यासाठी तंत्रज्ञानाधारित परीक्षा प्रणाली उभारण्यावर भर

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर देशभरात उसळलेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर परीक्षा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.**

परीक्षा प्रक्रियेला अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधारित बनविण्यासाठी इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय कृतिगट स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केली. लोकसभेत सोमवारी सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांचा प्रतिबंध) दुरुस्ती विधेयक-२०२६ मांडण्यात येणार असून, त्यापूर्वी पंतप्रधानांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओद्वारे या कृतिगटाची माहिती दिली. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित करणे, परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास दृढ करणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून



गैरप्रकारांना आळा घालणे हा या कृतिगटाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताची शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनविण्यासाठी हा कृतिगट महत्त्वाची भूमिका बजावेल. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल सुरक्षा, डेटा संरक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी हा गट केंद्र सरकारला शिफारसी करणार आहे. या कृतिगटामध्ये इस्रोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ, गुप्तचर विभागाचे (IB) माजी संचालक तपन डेका, आयआयटी मद्रासचे संचालक व्ही. कामकोटी, माजी शिक्षण सचिव अनिता करवाल आणि लॉजिस्टिक्स तज्ज्ञ अमृतलाल मीना यांचा समावेश करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा अनुभव लक्षात घेऊन देशासाठी मजबूत परीक्षा प्रणाली उभारण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, लोकसभेत मांडण्यात येणाऱ्या सार्वजनिक परीक्षा दुरुस्ती विधेयकात पेपरफुटी आणि परीक्षा गैरप्रकारांविरोधात कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या पेपरफुटी किंवा परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांना किमान पाच वर्षे आणि कमाल दहा वर्षांपर्यंत कारावास तसेच ₹५० लाखांपर्यंत दंड होऊ शकतो. संघटित गुन्ह्यांच्या प्रकरणात किमान सात वर्षांची शिक्षा आणि ₹१० कोटींपर्यंत दंड करण्याचा प्रस्ताव आहे.

### पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्राची मोठी घोषणा

दुसरीकडे, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात या मुद्द्यावर विरोधक आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता आहे. जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईचा मुद्दा उपस्थित करून इंडिया आघाडी सरकारला घेरण्याची तयारी करत आहे. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमार आणि इतर पोलिस कारवाईबाबत सरकारकडून स्पष्टीकरण मागण्याची भूमिका विरोधकांनी घेतली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना जबाबदार धरत, या कारवाईला परवानगी कोणी दिली, असा प्रश्न उपस्थित केला आहे. यासंदर्भात त्यांनी अमित शहा यांना पत्रही पाठवले असून, संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित राहून या विषयावर भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जाण्याची शक्यता आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# संतापलेल्या पतीकडून पत्नीची चाकूने हत्या!

## कलम 103(1) अंतर्गत गुन्हा दाखल

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी:** भडगाव तालुक्यातील वसंतवाडी तांडा येथे रविवारी (दि. 26) सकाळी साडेआठच्या सुमारास कौटुंबिक वादाचे पर्यवसान थेट हत्येत झाल्याची धक्कादायक घटना घडली. शेती विकण्यास तसेच दारू पिण्यासाठी पैसे देण्यास पत्नीने नकार दिल्याच्या रागातून पतीने तिच्यावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्माराम पतीलाल राठोड (वय 40) याने त्याची पत्नी ललिता आत्माराम राठोड (वय 36) हिच्याकडे दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली होती. तसेच शेती विकण्याबाबतही त्याने आग्रह धरला होता. मात्र ललिता राठोड यांनी यास नकार दिल्याने दोघांमध्ये वाद झाला. या वादाच्या भरात संतापलेल्या आत्माराम राठोड याने चाकूने पत्नीच्या पोटावर वार केले. गंभीर जखमी झालेल्या ललिता राठोड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच भडगाव पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपी आत्माराम



राठोड याला त्वरित ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक पथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, भडगाव येथे पाठविण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृत महिलेचे भाऊ प्रकाश मेहराम चव्हाण (रा. दळवेल, ता. पारोळा) यांच्या फिर्यादीवरून भडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 240/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 103(1) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मी कारंकार करीत आहेत.

# WhatsApp वर अज्ञात फाइल्स डाऊनलोड करणे ठरू शकते महाग!

## 'View Details', 'Invoice' किंवा 'Document' नावाच्या संशयास्पद फाइल्सपासून दूर राहा

जन सम्राट टाईम्स

**विशेष| प्रतिनिधी :** ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन आणि 'आपले सरकार' यांच्या वतीने नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण सायबर सुरक्षा सूचना (CYBER ADVISORY) जारी करण्यात आली आहे. सायबर गुन्हेगार आता WHATSAPP च्या माध्यमातून नागरिकांच्या मोबाईलमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवून आर्थिक फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशी केली जाते फसवणूक सायबर भामटे WHATSAPP वर "VIEW DETAILS", "INVOICE" किंवा "DOCUMENT" अशा आकर्षक नावांनी ZIP फोल्डर किंवा इतर फाइल्स पाठवतात. या फाइल्समध्ये प्रामुख्याने .EXE किंवा .DLL प्रकारच्या धोकादायक फाइल्स असतात.नागरिकांनी



अशा फाइल्स उघडल्या किंवा इन्स्टॉल केल्यास सायबर गुन्हेगार मोबाईल व WHATSAPP खात्यावर अनधिकृत ताबा मिळवू शकतात. त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या संपर्क यादीतील मित्र, नातेवाईक किंवा परिचितांना फसवे संदेश पाठवून पैशांची मागणी केली जाते आणि आर्थिक फसवणूक केली जाते. नागरिकांनी घ्यावयाची काळजी महाराष्ट्र शासनाने नागरिकांना पुढील बाबींचे पालन करण्याचे आवाहन केले आहे: WHATSAPP वर अनोळखी क्रमांकावरून आलेल्या .EXE किंवा .DLL फाइल्स कधीही उघडू किंवा इन्स्टॉल करू नयेत. "VIEW DETAILS", "INVOICE" किंवा "DOCUMENT" नावाने आलेल्या संशयास्पद ZIP फाइल्स किंवा लिंक्सवर क्लिक करणे टाळावे. अनोळखी स्रोतांमधून (UNKNOWN SOURCES) कोणतेही ॲप किंवा फाइल डाऊनलोड करू नये.

मित्र किंवा नातेवाईकांच्या नावाने अचानक पैशांची मागणी करणारा संदेश आल्यास, पैसे पाठविण्यापूर्वी संबंधित व्यक्तीशी थेट फोनवर संपर्क साधून खात्री करावी. मोबाईल आणि WHATSAPP ॲप नेहमी अधिकृत स्रोतांवरून अद्ययावत (UPDATE) ठेवावे. सतर्क राहा, सुरक्षित राहा सायबर गुन्हेगार सातत्याने नवीन पद्धती वापरत असल्याने इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करताना प्रत्येक नागरिकाने दक्षता बाळगणे आवश्यक आहे. कोणतीही संशयास्पद लिंक, फाइल किंवा संदेश आल्यास त्याकडे दुर्लक्ष करावे आणि आवश्यक असल्यास संबंधित यंत्रणेला माहिती द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे.

### केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर

# धुळ्यात विजयी तिरंगा रॅली!

जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाला यश आल्याचा दावा करत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर धुळे शहरात समविचारी पक्ष व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने विजयी तिरंगा रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून आग्रा रोड येथून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही रॅली महात्मा गांधी पुतळा परिसरात समारोपास पोहोचली. रॅलीचे मुख्य आकर्षण म्हणजे तब्बल ६०० मीटर लांबीचा तिरंगा ध्वज होता.




यावेळी महापुरुष तसेच देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीदांच्या प्रतिमा हातात घेऊन सहभागी नागरिकांनी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने या विजयी तिरंगा रॅलीत सहभागी झाले.

# आडगाव येथे 'श्री गुरु पौर्णिमा महोत्सव २०२६'चे भव्य आयोजन

## देवगोपालजी महाराज शास्त्री व संत महाहंस जी महाराज यांचे आशीर्वचन लाभणार

जन सम्राट टाईम्स

**आडगाव | प्रतिनिधी :** मनुदेवी रोडवरील संत कुटिया, आडगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'श्री गुरु पौर्णिमा महोत्सव २०२६' चे भव्य आयोजन बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे. धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांनी परिपूर्ण असलेल्या या महोत्सवाला उत्तर महाराष्ट्रासह विविध भागांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाची सुरुवात सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत बालविदुषी सुश्री जयाकिशोरी जी यांच्या भक्तिमय कीर्तन सेवेद्वारे होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.०० ते १०.३० या वेळेत दीपप्रज्वलन व गुरु वंदन पूजनाचा कार्यक्रम होईल. सकाळी १०.३० ते ११.०० या वेळेत मान्यवरांचे उद्बोधन तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यानंतर सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या वेळेत परम पूजनीय गुरुवर्य श्री देवगोपालजी महाराज शास्त्री (श्री मोठेबाबाजी) यांचे आशीर्वचन होईल. तसेच दुपारी १२.०० ते १२.३० या वेळेत संत श्री बाबा महाहंस जी महाराज (लहान बाबाजी) यांचे समारोपीय प्रवचन आणि मार्गदर्शन होणार आहे. महोत्सवाच्या समारोपानंतर दुपारी १२.३० ते ३.०० या वेळेत महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला असून, ही सेवा मुंजोबा भक्त ह.भ.प. श्री दीपक महाराज पाटील चिंचोलीकर यांच्या सौजन्याने भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आयोजकांनी जळगाव जिल्ह्यासह बाहेरून येणाऱ्या सर्व भाविकांनी कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहून महोत्सवाचा लाभ घ्यावा, तसेच नियोजनास सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. हा महोत्सव गुरुवर्य बाबाजी भक्त परिवार (उत्तर महाराष्ट्र-खान्देश) आणि संत कुटिया भक्त मंडळ, आडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.आडगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'श्री गुरु पौर्णिमा महोत्सव २०२६' चे भव्य आयोजन बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे. धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांनी परिपूर्ण असलेल्या या महोत्सवाला उत्तर महाराष्ट्रासह विविध भागांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सुरुवात सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत बालविदुषी सुश्री जयाकिशोरी जी यांच्या भक्तिमय कीर्तन सेवेद्वारे होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.०० ते १०.३० या वेळेत दीपप्रज्वलन व गुरु वंदन पूजनाचा कार्यक्रम होईल.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज


# आरक्षणाच्या न्यायालयीन तिढ्यामुळे जि.प.-पंचायत समिती निवडणुका लांबणीवर

## न्यायालयात निर्णय न झाल्याने प्रतीक्षा कायम; २० जिल्ह्यांतील आरक्षणाचा मुद्दा अद्याप प्रलंबित

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या प्रलंबित निवडणुकांबाबत पुन्हा एकदा अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात अंतिम निर्णय न झाल्यामुळे निवडणुकांची प्रक्रिया पुन्हा लांबणीवर पडली असून, जळगावसह राज्यातील अनेक जिल्ह्यांतील इच्छुक उमेदवार आणि राजकीय पक्षांची प्रतीक्षा आणखी वाढली आहे. गेल्या चार वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होऊन निवडणुकांचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा





व्यक्त केली जात होती. मात्र आरक्षणाच्या प्रश्नावर अद्याप निर्णय न झाल्याने निवडणूक प्रक्रियेला पुन्हा ब्रेक लागला आहे. राज्य सरकारने महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू केली. मात्र जळगाव जिल्हा परिषदेसह राज्यातील सुमारे २० जिल्हा परिषदांमध्ये एकूण आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाल्याचा मुद्दा पुढे आला. या आरक्षणाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याने निवडणूक प्रक्रिया रखडली. दरम्यान, ज्या १२ जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत होती, त्या ठिकाणी निवडणुका पार पडल्या. मात्र जळगावसह उर्वरित जिल्ह्यांमध्ये न्यायालयीन निर्णयाच्या प्रतीक्षेमुळे निवडणुकांचे भवितव्य अद्याप अधांतरीच आहे. जळगाव जिल्हा परिषदेत प्रशासक नियुक्त होऊन आता चार वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे. कोरोना महामारीनंतर निवडणुका होतील, अशी अपेक्षा होती. मात्र आरक्षणाच्या वादामुळे ही प्रक्रिया सातत्याने पुढे ढकलली जात आहे. एप्रिल-मे महिन्यात निवडणुका होण्याची चर्चा होती, परंतु न्यायालयीन निर्णय प्रलंबित राहिल्याने ती शक्यता मावळली. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतरच राज्य निवडणूक आयोग पुढील निवडणूक कार्यक्रम जाहीर करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### आरक्षणाचा मुद्दा अद्याप प्रलंबित

पंचायत समिती निवडणुकांसाठी उत्सुक असलेल्या इच्छुक उमेदवारांसह राजकीय पक्षांची प्रतीक्षा आणखी वाढली असून, आता सर्वांचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीकडे लागले आहे. राज्य सरकारने महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू केली. मात्र जळगाव जिल्हा परिषदेसह राज्यातील सुमारे २० जिल्हा परिषदांमध्ये एकूण आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाल्याचा मुद्दा पुढे आला. या आरक्षणाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याने निवडणूक प्रक्रिया रखडली. दरम्यान, ज्या १२ जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत होती, त्या ठिकाणी निवडणुका पार पडल्या.

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या राष्ट्रीय अधिवेशनाची तयारी

जन सम्राट टाईम्स

**ठाणे | प्रतिनिधी :** 'व्हॉईस ऑफ मीडिया' आणि 'व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम' यांच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ जुलै रोजी नवी दिल्ली येथील विश्व युवक केंद्रात दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनासाठी देशभरातील पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकार, संपादक, माध्यम तज्ज्ञ आणि विविध राज्यांतील प्रतिनिधी मोठ्या संख्येने दिल्लीकडे रवाना होत असून पत्रकारितेशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर राष्ट्रीय स्तरावर व्यापक मंथन होणार आहे. अधिवेशनामध्ये भारतीय पत्रकारितेची सद्यस्थिती, बदलते माध्यमविश्व आणि पत्रकारितेचे भविष्य या विषयांवर सखोल चर्चा केली जाणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत विविध सत्रांमध्ये तज्ज्ञांची व्याख्याने, परिसंवाद, मुक्त संवाद आणि

VOICE OF MEDIA
Fight for the Journalism & Journalists...!

अनुभवकथनाद्वारे पत्रकारितेतील बदलत्या प्रवाहाचा आढावा घेतला जाणार आहे. पत्रकार संरक्षण कायद्याची आवश्यकता, वृत्तपत्र स्वातंत्र्य, माध्यमांची विश्वासार्हता, पत्रकारांचे सामाजिक व आर्थिक हक्क, डिजिटल पत्रकारितेतील संधी व आव्हाने, फेक न्यूजवर नियंत्रण, कौशल्य विकास, माध्यम नीतिमत्ता, पत्रकार कल्याण योजना आणि नव्या तंत्रज्ञानाचा प्रभाव अशा विविध विषयांवर सविस्तर विचारमंथन करण्यात येणार आहे. तसेच विविध राज्यांतील यशस्वी उपक्रम आणि संघटनात्मक अनुभवांची देवाणघेवाण करून भविष्यातील कृती आराखडाही निश्चित केला जाणार आहे.

# शहीदांचे बलिदान राष्ट्रप्रेम शिकवते, तर रक्तदात्याची नि:स्वार्थ सेवा माणुसकी जपते" – पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील

## कारगिल विजय दिनानिमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स




**जळगाव / पाळधी | | प्रतिनिधी :** कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ११५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून कारगिलच्या वीर शहीदांना कृतीतून अभिवादन केले. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी शहीदांच्या बलिदानाचे स्मरण करत राष्ट्रप्रेम, समाजसेवा आणि रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

लोकशाहीर सखाराम जोशी प्रतिष्ठान, भारत विकास परिषद आणि माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी बोलताना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील म्हणाले, "शहीदांचे बलिदान आपल्याला राष्ट्रप्रेम शिकवते, जवानांचे शौर्य धैर्याची प्रेरणा देते आणि रक्तदात्याची निःस्वार्थ सेवा माणुसकीचा खरा अर्थ सांगते. या मूल्यांचे जतन करणे, हाच कारगिल विजय दिन साजरा करण्यामागील खरा उद्देश आहे."

ते पुढे म्हणाले की, "सीमेवर जवान राष्ट्ररक्षणासाठी रक्त सांडतो, तर रक्तदाता गरजूंना नवजीवन देतो. या दोन्ही सेवा राष्ट्रासाठी तितक्याच मोलाच्या आहेत." त्यांनी जिल्ह्यातील २९ शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात येणाऱ्या शहीद स्मारकाच्या कामाला पुढील महिन्यात प्रारंभ होणार असल्याची माहिती देत, २९ ऑगस्ट रोजी विशेष कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. कर्तव्यनिष्ठांचा गौरव कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते त्यांच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावणारे पोलीस शिपाई गोरख पाटील आणि अनिल धनगर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच समाजसेवा, आरोग्यसेवा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. नीलिमा सेठिया, डॉ. सई नेमाडे, दर्शन जोशी आणि महेश दीक्षित यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. रक्तदात्यांनाही प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. पोवाड्यांतून जागवला राष्ट्रभक्तीचा जाज्वल्य भाव कार्यक्रमात शाहीर संग्राम जोशी आणि शाहीर संदीप जोशी यांनी कारगिलच्या वीर जवानांच्या शौर्यगाथेवर तसेच रक्तदानाच्या महत्त्वावर आधारित ओजस्वी पोवाडा सादर केला. त्यांच्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांमध्ये राष्ट्रभक्तीचा उत्साह संचारला. लोककलेच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम आणि समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश दिल्याबद्दल पालकमंत्र्यांनी त्यांच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सोमनाथ महाजन यांनी केले, तर आभार प्रदर्शन शाहीर संदीप जोशी यांनी मानले.

### यांची होती प्रमुख उपस्थिती

या कार्यक्रमास जळगाव शहराचे आमदार राजू (मामा) भोळे, महापौर सौ. दीपमाला काळे, लोकशाहीर सखाराम जोशी प्रतिष्ठानचे अध्यक्ष शाहीर संग्राम जोशी, सचिव शाहीर संदीप जोशी, भारत विकास परिषदेचे अध्यक्ष अनिरुद्ध कोटस्थाने, प्रांताध्यक्ष विशाल चोरडिया यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवसाई मंदिरात आषाढी निमित्त भक्तिमय भजन सोहळा



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त जळगाव येथील देवीदास कॉलनीतील श्री शिवसाई मंदिरात भक्तिमय भजन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्यात परिसरातील महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि बालभाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विठ्ठलभक्तीचा आनंद लुटला. कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन व महापूजेने करण्यात आली. त्यानंतर स्थानिक भजनी मंडळांनी संतांच्या अभंगांचे सुमधुर सादरीकरण करत वातावरण भक्तिमय केले.

"ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" आणि "घेऊनि गुरुजींचा हात, पंढरीची वाट धरू" या अभंगांनी आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला. भक्तिरसात तल्लीन झालेल्या भाविकांनी टाळ-मृदुंगाच्या तालावर ठेका धरत हरिनाम संकीर्तनात सहभागी होत विठ्ठलभक्तीचा आनंद अनुभवला.

संपूर्ण मंदिर परिसर विठ्ठलमय वातावरणाने भारावून गेला होता. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर उपस्थित भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी राज्याच्या, समाजाच्या आणि सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य, शांती आणि लोककल्याणासाठी सामूहिक प्रार्थना केली. धार्मिक परंपरा, वारकरी संस्कृती आणि सामूहिक भक्तीचा सुंदर संगम घडविणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ऑर्डनन्स फॅक्टरीच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान

## घुसखोरी करणाऱ्या दोघांवर गंभीर गुन्हा




जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** भुसावळ तालुक्यातील *वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी (आयुध निर्माणी)*च्या अतिसंवेदनशील आणि मनाई क्षेत्रात अनधिकृतपणे प्रवेश करून संशयास्पद हालचाली केल्याप्रकरणी तळवेल (ता. भुसावळ) येथील दोघांविरुद्ध वरणगाव पोलीस ठाण्यात शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे संरक्षण विभागाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांनी तपासाची व्याप्ती वाढवली आहे. ऑर्डनन्स फॅक्टरीचे कनिष्ठ कार्य प्रबंधक अभिजीत गौरनपद नंदी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, २३ जुलै रोजी दुपारी सुमारे १ वाजेच्या सुमारास निलेश बळीराम ताटे आणि राजेंद्र श्रीधर कोळी (दोघे रा. तळवेल, ता. भुसावळ) यांनी चोरी करण्याच्या उद्देशाने मनाई क्षेत्रात अनधिकृत प्रवेश केला. दोघेही सुरक्षा चौकी क्रमांक ६ आणि ७ दरम्यान संरक्षण भिंतीच्या बाहेरील बाजूस संशयास्पद हालचाली करताना सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. तात्काळ घेतले ताब्यात ऑर्डनन्स फॅक्टरीचा परिसर संरक्षण विभागासाठी अत्यंत संवेदनशील असल्याने येथे सर्वसामान्य नागरिकांना प्रवेशास सक्त मनाई आहे. अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा, सुरक्षा चौक्या आणि सशस्त्र सुरक्षा कर्मचारी तैनात असलेल्या परिसरात संशयास्पद हालचाली आढळताच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी दोघांना ताब्यात घेऊन प्राथमिक चौकशी केली. त्यानंतर घटनेची माहिती वरणगाव पोलिसांना देण्यात आली. फिर्यादीच्या तक्रारीवरून दोन्ही संशयितांविरुद्ध शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ च्या कलम ३ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३२९(३), ३०३ आणि ६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाची व्याप्ती वाढवली संशयितांचा नेमका उद्देश काय होता, ते मनाई क्षेत्रात कोणत्या कारणासाठी आले होते, त्यांच्याकडे कोणते साहित्य होते का आणि या प्रकरणात इतर कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

# जंतर-मंतरवर 'जयभीम'चा जयघोष!

## संविधान, समता आणि स्वाभिमानाचा संदेश

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ | प्रतिनिधी :** इतिहासात काही शब्द असे असतात, जे केवळ उच्चार नसतात तर ते एका विचाराचे, चळवळीचे आणि परिवर्तनाचे प्रतीक बनतात. "जयभीम" हा त्यापैकीच एक शब्द आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन उदयास आलेला हा जयघोष आज समता, न्याय, बंधुता आणि स्वाभिमानाचा संदेश देणारा घोष बनला आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध सामाजिक प्रश्नांवर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान पुन्हा एकदा *"जयभीम"*चा नारा दुमदुमला. आंदोलनात सहभागी झालेल्या नागरिकांनी संविधानिक मूल्यांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि समानतेच्या मागण्यांसाठी हा घोष दिला. "जयभीम" या शब्दात भगवान बुद्धांची करुणा, भारतीय संविधानातील न्याय, समता आणि प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार सामावलेला आहे. त्यामुळे हा केवळ अभिवादनाचा शब्द नसून एका व्यापक सामाजिक विचारसरणीचे प्रतीक मानला जातो. "जयभीम"ची चार अक्षरे, चार प्रेरणा ज – जगण्याचा मार्ग: शिक्षण, विवेक आणि विज्ञाननिष्ठ विचार स्वीकारण्याचा संदेश. डॉ. आंबेडकरांचे "शिका" हे आवाहन यामागे आहे. य – यश: मेहनत, चिकाटी आणि संघटित प्रयत्नांतून यश संपादन करण्याची प्रेरणा. "संघटित व्हा" या विचाराशी जोडलेली दिशा. भी – भीतीवर विजय: अन्यायाविरोधात निर्भयपणे उभे राहण्याचे धैर्य. "संघर्ष करा" या संदेशाचा गाभा. म – माणुसकी: जात, धर्म, भाषा आणि लिंगभेदापलीकडे जाऊन बंधुता, समानता आणि स्वाभिमानाने जगण्याचा विचार. थोडक्यात, "जयभीम" म्हणजे शिक्षण, संघटन, संघर्ष, निर्भयता आणि माणुसकीचा मार्ग. आजही "जयभीम" हा घोष अनेकांसाठी सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा, संविधानावरील निष्ठा आणि समानतेच्या मूल्यांप्रती असलेली बांधिलकी व्यक्त करणारा संदेश मानला जातो. पूर्वजांच्या संघर्षाला अभिवादन करत पुढील पिढ्यांसाठी न्याय्य, समताधिष्ठित आणि संविधानिक भारत घडविण्याचा संकल्प या जयघोषातून व्यक्त होत असल्याची भावना आंदोलनातील सहभागी व्यक्तींनी व्यक्त केली.

# भर पावसात १२५ रोपांचे वृक्षारोपण; २६० युवकांचा उत्स्फूर्त सहभाग!

## जीजीयुएस फाउंडेशनचा पर्यावरण संवर्धनासाठी स्तुत्य उपक्रम

जन सम्राट टाईम्स



**डोंबिवली | प्रतिनिधी:** पर्यावरण संवर्धनाचा संदेश कृतीतून देत निर्मल यूथ फाउंडेशन (NYF) आणि जीजीयुएस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली (पूर्व) येथील रेल्वे कॉलनी गार्डनमध्ये शनिवारी (दि. २५ जुलै) भव्य वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. मुसळधार पावसाची पर्वा न करता तब्बल २६० स्वयंसेवकांनी या उपक्रमात सहभागी होत १२५ विविध प्रजातींच्या रोपांची लागवड केली. या उपक्रमाला कल्याण-डोंबिवली महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त मा. कोकरे सर, मा. घोडेकर सर तसेच अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. या उपक्रमाचे नेतृत्व कु. अक्षता औटी आणि श्री. गगन शिंदे यांनी केले. प्रगती महाविद्यालय (ज्युनिअर व डिग्री विभाग), मंजुनाथ महाविद्यालय, वंदे मातरम् महाविद्यालय, मॉडेल महाविद्यालय, गार्डियन महाविद्यालय आणि साऊथ इंडियन महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण रक्षणाच्या मोहिमेला बळ दिले. उपक्रमात AGR Foundation, Smadhuna Foundation, Eagle Brigade Foundation, MMJC Group आणि Parab Associates यांनीही सक्रिय सहभाग नोंदवत आयोजनाच्या यशात मोलाची भूमिका बजावली. वृक्षारोपणासोबतच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असा संदेश यावेळी देण्यात आला. लागवड करण्यात आलेल्या सर्व रोपांच्या संरक्षणाची जबाबदारी सहभागी विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी स्वीकारली. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सर्व उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेत भविष्यात अधिकाधिक वृक्षारोपण करण्याचा निर्धार व्यक्त केला. विविध संस्था, स्वयंसेवक, महाविद्यालये आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आषाढी एकादशीनिमित्त मोफत शैक्षणिक साहित्य वाटप!

जन सम्राट टाईम्स




**शिवडी, मुंबई । प्रतिनिधी:** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने वंचित बहुजन आघाडी, शिवडी तालुका (वॉर्ड क्र. २०२) यांच्या वतीने गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. परिवार साफल्य हाऊसिंग सोसायटीबाहेर, दा. ग. महाजनी पथ, शिवडी येथे आयोजित या कार्यक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, इरेझर आणि शार्पनरचे वाटप करण्यात आले. शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे मुंबई अध्यक्ष चेतन अहिरे, मुंबई महासचिव समीर कांबळे, बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित शिक्षण घेण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे आयोजन गुणवंत भालेकर, प्रतीक जाधव, महेश तांबे, संजय भालेराव, सुभाष काळे, प्रदीप गुलाबराव जाधव, सुमेर खरे, ॲड. विकास गांगुर्डे, सतीश गांगुर्डे, वेदांत पागडे, वैशाली विजय भालेराव, महेश्वरी तांबे, श्रद्धा भालचंद्र जाधव, उज्वला काळे आणि वैशाली गुणवंत भालेकर यांनी केले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी :** सत्यशोधक समाजाचे संस्थापक, शिक्षणक्रांतीचे प्रणेते आणि आधुनिक भारताचे शिल्पकार महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त एरंडोल येथील महात्मा फुले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सत्यशोधक समाज संघ, एरंडोल आणि नगरसेवक अनिल महाजन यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने हा समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतुल महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एरंडोलचे नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर होते. प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त तहसीलदार अरुण माळी, नगरसेवक अनिल महाजन, सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद महाजन, सत्यशोधक विधीकर्ते शिवदास महाजन, रुपेश महाजन, नगरसेविका सुनीता माळी, माजी उपनगराध्यक्ष कुणाल महाजन, आनंद दाभाडे, नगरसेवक रवींद्र महाजन, मनोज महाजन, तालुकाध्यक्ष हिलाल माळी तसेच अनिल महाजन मित्र परिवार आणि सत्यशोधक समाज संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि परिवर्तनवादी कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांसमोर त्यांच्या जीवनसंघर्षाची प्रेरणादायी माहिती मांडली. "भारतीयांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य सत्यशोधक महात्मा जोतिराव फुले यांनी केले," असे प्रतिपादन त्यांनी केले. शाळेचे संचालक अरुण माळी यांनीही या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

# श्री समर्थ महिला बहुद्देशीय संस्था'वर आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप

## संचालक मंडळ, आरओ प्लांट आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी :** भुसावळ शहरातील जामनेर रोड, श्रद्धा नगर परिसरातील 'श्री समर्थ महिला बहुद्देशीय संस्था' (नोंदणी क्र. ८९१८) संचलित श्री संत गजानन महाराज देवस्थान संदर्भात आर्थिक आणि प्रशासकीय अनियमिततेचे गंभीर आरोप समोर आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रमोद जगन्नाथ पाटील यांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव यांच्याकडे पुराव्यांसह तक्रार दाखल केल्याचा दावा करत संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, संस्थेच्या नावाने कथितरीत्या विनापरवाना वर्गणी संकलन, आर्थिक व्यवहारातील अनियमितता, नियमित लेखापरीक्षणाचा अभाव, सार्वजनिक जागेचा वापर तसेच संस्थेमार्फत चालविण्यात येत असल्याचा दावा असलेल्या आरओ प्लांटच्या उत्पन्नाचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संस्थेच्या उद्दिष्टांबाबत प्रश्न तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित संस्था महिला सक्षमीकरण, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि सामाजिक कार्यासाठी नोंदणीकृत आहे. मात्र, संस्थेच्या नोंदणीकृत उद्दिष्टांमध्ये देवस्थान चालविणे किंवा देवस्थानाच्या नावाने वर्गणी गोळा करण्याचा अधिकार आहे का, याची धर्मादाय विभागाने पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### ओपन स्पेस आणि बांधकामाची चौकशी

सर्व्हे क्रमांक ११५/१/अ येथील सार्वजनिक वापरासाठी राखीव जागेवर कथितरीत्या शेड किंवा इतर बांधकाम करण्यात आले असल्यास महसूल, नगररचना आणि संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून अहवाल सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संस्थेमार्फत चालविण्यात येत असल्याचा दावा असलेल्या आरओ प्लांटसाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या माध्यमातून अनेक वर्षांपासून मिळालेल्या कथित उत्पन्नाची लेखा नोंद, ऑडिट आणि धर्मादाय विभागाकडे सादर करण्यात आलेले हिशेब तपासावेत, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.भाविकांकडून मिळालेल्या देणग्या, वर्गणी, आरओ प्लांटमधून प्राप्त होणारे उत्पन्न आणि इतर सर्व आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण (Special Audit) करून निधीचा वापर नियमांनुसार झाला आहे का, याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.


Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306